पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक ०७/०१/२०१९

# वार्तापत्र

## ‘‘आत्मसमर्पितांसाठी रोजगार मार्गदर्शन मेळावा संपन्न’’

महाराष्ट्र पोलीस दिनाच्या स्थापना दिनानिमित्त ‘रेझिंग डे’ च्या माध्यमातुन विविध कार्यक्रमाचे आयोजन गडचिरोली पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे. गडचिरोली पोलीस दलासमोर आजपर्यंत एकुण ६१३ माओवादयांनी आत्मसमर्पण केले आहे. या माओवादयांच्या आत्मसमर्पणानंतर त्यांना शासनाच्या विविध योजना मार्फतीने गडचिरोली पोलीस दल मदत करत असते. विविध योजनांच्या माध्यमातुन आत्मसमर्पितांना घरकुल, कृषी उदयोग साहीत्य, शिलाई मशिन इत्यादीचे वाटप करण्यात येते.

आज रोजी आत्मसमर्पित माओवादयांना शासनाच्या इतर विभागांच्या योजना यांची माहिती व्हावी व त्या त्यांच्या पर्यंत पोहचविण्यासाठी तसेच त्यांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी पोलीस मुख्यालय, गडचिरोली येथे ‘ रोजगार मार्गदर्शन मेळावा ’ आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यास मार्गदर्शक म्हणुन श्री प्रशांत वैदय, आयुक्त, मत्सव्यवसाय गडचिरोली , श्री योगेंद्र शेंडे , कौशल विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन अधिकार, प्रिती हीरालकर मॅडम, उप विभागीय कृषी अधिकारी गडचिरोली आणि श्री गौरकर, वरिष्ठ निरीक्षक, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय गडचिरोली हे उपस्थित होते. यावेळी त्यांनी आत्मसमर्पितांना शासनाच्या कोणकोणत्या योजनांचा लाभ घेता येईल याबाबत अंत्यत सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी मा. पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा. यांनी आत्मसमर्पित माओवादयांशी संवाद साधुन त्यांच्या अडी-अडचणी समजुन घेतल्या  व माओवादयांनी विकासाच्या दिशेने पाऊल उचलले याबद्दल सर्वांचे अभिनंदन करुन सर्वांच्या कल्याणासाठी गडचिरोली पोलीस दल नेहमीच आपल्या पाठीशी आहे. असे आश्वासन दिले.

सदर प्रसंगी मा. अपर पोलीस अधीक्षक (अभियान) डॉ. हरी बालाजी, मा. अपर पोलीस अधीक्षक (नक्षल) डॉ. मोहीत गर्ग आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पोलीस उप निरीक्षक विनायक सपाटे व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.


गडचिरोली जिल्हा पोलीस दल
द्वारा आयोजित
- २०१९


गडचिरोली जिल्हा पोलीस दल
द्वारा आयोजित
आत्मसमर्पीत
मार्गदर्शन मेळावा - २०१९